REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 4 | JANUARY - 2024

# जातक कथा: समाजप्रबोधनाचे वैश्विक साधन

अहिल्या कांबळे[१] आणि डॉ.टी.एन.शिंदे[२]
[१]संशोधक विद्यार्थी, एम ए बी एड सेट, जि प.शाळा मोहोळ नंबर 3
[२]मार्गदर्शक, एम ए सेट, पीएच.डी., प्राचार्य ,ए.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय , सोलापूर

## प्रस्तावना:



जातक या शब्दाचा अर्थ विकिपीडिया मध्ये जन्म गाथा जन्माशी संबंधित असा दिला आहे तर जातक कथासंग्रह या आचार्य धर्मानंद कोसंबी यांच्या ग्रंथात जातकाचा अर्थ पुढील प्रमाणे दिला आहे.जातकाचा मूळ अर्थ जे घडून गेले आहे त्यासंबंधीची हकीकत किंवा पाली साहित्यानुसार बुद्धाच्या पूर्व जन्मातील कथा असा आहे [1] परंतु तथागत बुद्धानी तर पुनर्जन्म व आत्मा त्यांचे अस्तित्व नाकारले आहे. दुसऱ्या दृष्टिकोनातून त्याच्याकडे पाहिले आहे.त्यामुळे पूर्वजन्म या आख्यायिका कडे दुर्लक्ष केले तर नीतिकथा आणि समाज प्रबोधनाचे एक सशक्त माध्यम म्हणून या जातक कथांनी प्रदीर्घकाळपर्यंत समाजमन तयार केले आहे. समाजाला दिशादर्शन केले आहे. आणि तेही केवळ भारतातच नाही तर संपूर्ण विश्वात या कथा सांगितल्या गेल्या आणि त्यांनी आपले प्रबोधनाचे कार्य केले आहे.

## उद्देश

१. जातक कथा रचने मागील उद्देश समजावून घेणे
२. जातक कथांचा सखोल अभ्यास करणे
३. तत्कालीन समाज जीवन समजावून घेणे.
४. तत्कालीन स्त्रियांच्या सामाजिक दर्जाचा अभ्यास करणे.
५. कथेला अनुसरून आलेल्या गाथा समजावून घेणे.
६. दहा पारमितांचा अभ्यास करणे.

## गृहितके:

१. जातक कथांची निर्मिती ही समाजाला कुशलकर्माची शिकवण देण्यासाठी झाली आहे
२. प्रत्येक व्यक्तीने दहा पारमिताने आपले जीवन संपन्न करण्यासाठी ह्या जातक कथा रचले आहेत.
३. या कथा समाजातील सर्वसामान्य व्यक्तींनी रचले आहेत.

४. या कथांचे लेखन बऱ्याच काळानंतर पुढे बौद्ध भिक्षणी केले आहे.
५. या कथांचे जगातील बहुतेक भाषेत भाषांतर झाले आहे.
६. या कथांनी समाज प्रबोधनाचे कार्य संपूर्ण विश्वात आणि प्रदीर्घकाळपर्यंत केले आहे.
७. जातक कथातील स्त्रिया आधुनिक स्त्रियांना प्रेरणा देतात.

## विषयविवेचन

### १. जातक कथांची निर्मिती व प्रबोधनात्मक स्वरूप

मनुष्यप्राणी गोष्टी वेल्हाळ आहे. एखादी शिकवण किंवा तत्व तो सहजासहजी स्वीकारत नाही. परंतु त्याच्याशी संबंधित जर एखादी मनोरंजक, अद्भुत, चमत्कृतीपूर्ण कथा, घटना असेल तर ती तो लवकर समजतो. वरील समाजमनाचे भान ठेवूनच या कथा रचले गेले आहेत. किंबहुना या कथा सामान्य लोकात प्रचंड लोकप्रिय होत्या.कारण आपण जर पाहिले तर सांचीच्या स्तुपावर "वेसन्तरा "जातक चित्रित आहे. तसेच" महाकपी"जातक ही चित्रित आहे. यावरून असे दिसून येते की सम्राट अशोकाच्या अगोदरही समाजात या कथा प्रचलित होत्या. आणि त्यांना लोककथांचे स्वरूप होते.

त्रिपिटकातील खुद्दक निकायात अंतर्भूत असणारे जातक कथा या गाथा स्वरूपात आहेत.या गाथा काव्याच्या दृष्टीने अत्यंत सुंदर आहेत. या गाथांचे कथानक स्पष्ट करण्यासाठी त्यावरील कथांची रचना करण्यात आली आहे असे दिसून येते.

या कथांचे पाच भाग आहेत

१. पच्चूपन्नवत्थु (प्रत्युत्पन्न वस्तू)
बुद्धाच्या काळात घडलेल्या एखाद्या प्रसंगाची कथा यात सांगितले जाते.हा भाग सुरुवातीला असतो

२. अतीतवत्थु
वर्तमान काळातील प्रसंगाला अनुसरून तथागतांनी भूतकाळातील एखादी घटना किंवा कथा सांगितली आहे ती अतीतवत्थु होय.

३. गाथा
गाथा या सर्वात प्राचीन आहेत. या गाथा म्हणजेच जातक होय.

४. वेय्याकरण किंवा अत्थवण्णना
गाथांचे विवेचन, शब्दांचा अर्थ, त्याचे स्पष्टीकरण वगैरे बाबी यात असतात.

५. समोधान
यातून काय उपदेश द्यायचा किंवा कोणते त्व रुजवायचे हे येथे येते.

बुद्ध धम्मात सर्व स्तरातील लोकांनी प्रवेश घेतलेला होता त्यामुळे त्यांना रुचेल ,पचेल अशा वैविध्यपूर्ण या कथा आहेत.त्याचे विषय पुढील प्रमाणे आहेत.

१. कल्पितकथा
या कथा सर्वसमावेशक असून त्यांना बुद्ध विचारांची जोड दिलेली आहे. तसेच बहुतेक या नीती विषयक व वैराग्य विषयक कथा आहेत.

२. अद्भुत कथा
प्राणी पक्षी,यक्ष, परिकथा वगैरेंच्या या कथा आहेत.

३. लहान कथानके ,विनोदी प्रसंग वगैरे

४. दीर्घकथा

यात अद्भुत व साहस कथा आहेत. या दीर्घ असून उपकथानके ही आहेत. त्या कथानकांचा नायक बोधिसत्व आहे.

५. नीतिकथा

बुद्ध प्रणित जीवन मार्ग अनुसरून या कथा सांगितलेले आहेत.

६. अध्यात्मिक कथा

यात अध्यात्माविषयी कथा आहेत.

## २. बोधिसत्व ,पारमिता व जातक कथा

"बोधी म्हणजे लोककल्याणाच्या तत्वाचे ज्ञान. त्या ज्ञानासाठी जो सत्व म्हणजे प्राणी सतत प्रयत्न करतो तो बोधिसत्व."[2] थोडक्यात बोधिसत्व म्हणजे "भावी बुद्ध "

सिद्धार्थ गौतमाचा जन्म सुमेध या बोधिसत्वापासून झालेला आहे. याचे वर्णन आपण "बुद्ध आणि त्यांचा धम्म" या डॉ .बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथात पाहू शकतो. 'इतक्यात सुमेध नावाचा एक बोधिसत्व तिच्या पुढे प्रकट झाला व तिला म्हणाला "मी माझा शेवटचा जन्म पृथ्वीवर घेण्याचे ठरविला आहे तू माझी माता होण्यास कबूल होशील का ?"तिने उत्तर दिले" मोठ्या आनंदाने" आणि त्याच क्षणी महामायेला जाग आली.[3] म्हणजे सुमेध बोधिसत्वाने पारमिता ग्रहण करण्यासाठी जे प्रयत्न केले त्याच्या कथा म्हणजे जातक कथा. पारमिता म्हणजे पारंगतता. बीज रूपात हे सर्व गुण प्रत्येकात असतात. पण जो यांचा प्रयत्नपूर्वक विकास करतो तो बोधिसत्व बनतो. बाबासाहेब आंबेडकरांनाही बोधिसत्व म्हणतात. थोडक्यात बोधिसत्वापासून" बुद्ध" बनण्या पर्यंतचा प्रवास म्हणजे या दहा पारमिता होय.

## दहा पारमिता

१. दानपारमिता

प्रथम पैसा , वस्तू यांच्या दानापासून सुरुवात.पुढे देशासाठी, समाजासाठी देहदान करण्याची ही पर्वा वाटणार नाही. उदा." वेसत्तर"जातकात आपला आवडता, शुभचिन्हयुक्त पांढरा हत्ती दान करतो. राज्य सोडतो. आपली प्रिय मुले आणि पत्नीचे हे दान करतो.

२. शील पारमिता

शिल म्हणजे व्यसन, परस्त्री, परधन यांचा हव्यास न करणे योग्य काळापर्यंत ब्रह्मचर्य आणि योग्य मार्गाने उदरनिर्वाह करणे म्हणजे शील. हे सर्वात महत्वाचा आहे. ज्याच्याकडे शील आहे त्याच्याकडे सर्व काही आहे. उदा." मघ "जातकात मघ म्हणतो की" कुमार्ग से निवृत्त होना और सत्कर्म मे प्रवृत्त होना इसे ही साधू लोग शील कहते है'.[4]

३. नैष्क्रम्य पारमिता

एकांताची गोडी लागणे व त्यात पूर्णत्व संपादन करून शरीराचा यथार्थ अर्थ जाणून घेणे याला नैष्क्रम्य पारमिता असे म्हणतात. उदा." महाजनक" जातकात महाजनकाने आपल्या शरीराचे यथार्थ ज्ञान करून घेऊन योग्य वेळी राजपाट सगळे सोडून परिव्राजक झाले.

४. प्रज्ञा पारमिता

प्रज्ञा म्हणजे लोक कल्याणाची तीव्र अपेक्षा धरून मिळविलेले सात्विक ज्ञान होय. अशी प्रज्ञा आपल्यात निर्माण झाली पाहिजे.

५. वीर्य पारमिता

वीर्य पारमिता म्हणजे सत्कर्म करण्याचा उत्साह. आळशी मनुष्य काहीच करू शकत नाही. मग बुद्ध बनणे ही तर सुळावरची पोळी. त्यासाठी तुमच्याकडे वीर्य म्हणजेच उत्साह असणे खूप महत्त्वाचे आहे. उदा. "महाजनक "जातकात महाजनकाने पोहून प्रचंड असा समुद्र पार केला आणि आपल्या वीर्य पारमिताचे दर्शन दिले. असा उत्साह आपल्याला हवा.

६. क्षान्ति पारमिता

क्षान्ति म्हणजे क्षमा करणे. राग आपल्याला आपोआप येतो परंतु क्षमेसाठी मात्र अभ्यास करण्याशिवाय पर्याय नाही. उदा."चुल्लबोधी," जातकात राजाने त्याच्या पत्नीला जरी ओढून नेलं तरी चुल्ल त्या राजाला क्षमा करतो आणि त्याच्या या विनम्रतेचा क्षमेचा राजा वर परिणाम होऊन तो त्याच्या पत्नीला सुखरूप आणि आदराने त्याच्याकडे पाठवून देतो.

७. सत्य पारमिता

क्षमेचा विप्रयास होऊ नये म्हणून सत्य पारमिताचा अभ्यास केला पाहिजे. प्रत्येकाला क्षमा करत बसलो तर अवघड आहे. म्हणून सत्य जिकडे आहे तिकडे आपण झाले पाहिजे.

८. अधिष्ठान पारमिता

अधिष्ठान म्हणजे दृढ निश्चय. त्यात पारंगतता संपादने म्हणजे अधिष्ठान पारमिता होय. एखाद्या कार्यकर्त्याला कितीही संकटे आली तरी मागे न फिरता ती कार्य करायचेच या निश्चयाने कार्य करणे. उदा." वेसन्तर" जातकामध्ये एकदा तपश्चर्येला बसल्यानंतर वेसंन्तराने आपल्याला कितीही दुःख आलं कितीही संकट आले तरी त्यापासून तो विचलित झाला नाही.

९. मैत्री पारमिता

भेदभाव न ठेवता सर्वांवर सारखे प्रेम करणे याला मैत्री म्हणतात. आणि यात पारंगतता मिळविणे म्हणजे मैत्री पारमिता होय. "वसुधैव कुटुंम्बकम्" ही भावना म्हणजे मैत्री. यात केवळ मनुष्यप्राणीच नाही तर संपूर्ण सृष्टीशी आपण मैत्री भाव निर्माण करतो.

१०. उपेक्षा पारमिता

आपण दुसऱ्याचे कल्याण करण्याचा प्रयत्न करतो परंतु तो मात्र आपल्याला विरोध करतो , तेव्हा त्याची अपेक्षा केली पाहिजे. उदा. एखाद्या दारूबाज माणसाला दारू सोडविण्यासाठी त्यांनी कितीही आपल्याला बोललो तरी त्याची उपेक्षाच आपण करावे लागते. कालांतराने त्याला आपली चूक समजेल आणि आपलं कार्य देखील समजेल अशी आपण अपेक्षा करायची. परंतु आधी घेतलेले काम मात्र पूर्ण करायचे. अशाप्रकारे पारमितांच्या पारंगततेसाठी जातक कथा निर्माण झाल्या.

## इतर प्राचीन ग्रंथातील जातक कथा

मुळ जातक कथा या पाली भाषेत आहेत.त्यांची संख्या ५४७ आणि त्या सर्वांचा संग्रह ," जातक अठ्ठकथा" या नावाने प्रसिद्ध आहे. पाली भाषेत ५४७ कथा असल्या तरी त्या खूप दीर्घ आहेत. म्हणजेच त्यात अनेक उपकथानके आहेत. त्यामुळे जर या कथा मोजल्या तर त्या जवळजवळ ३०० च्या आसपास जातात.

श्रीलंका, ब्रह्मदेश, थायलंड मध्ये मात्र या जातक कथांची संख्या 550 आहे. तसेच संस्कृत बौद्ध ग्रंथातही या कथा आहेत. महासांघिकांच्या "महावस्तू" या ग्रंथात इसवी सन 400 पूर्वी रचलेल्या जवळजवळ 80 लोककथा आहेत.आर्यशुरांच्या "जातक माला"मध्ये एकूण 34 कथा असून पैकी 28 कथा मूळ पाली जातक कथासंग्रहातील आहेत. इतर सर्व प्रकारच्या नीतिकथांवर जातक कथांचा प्रभाव आहे. गुणाढ्यच्या बृहत्कथा , विष्णूशर्माच्या पंचतंत्रात,क्षेमेंद्राच्या बृहत्कथा-मंजिरी, सोमदेवांच्या कथा- सरित-सागर.या ग्रंथात देखील जातक कथांचा समावेश आहे. एवढेच नाही तर "अलिफ लैला" म्हणजेच "अरेबियन नाईट्स" मध्येही जातकथांचा समावेश आहे.

म्हणूनच आनंद कौसल्यायन आपल्या सहा खंडाच्या भचमि सहा खंडांच्या भूमिकेमध्ये लिहितात " जर मनोरंजना सोबतच उपदेश ग्रहण करायचा असेल, मनाला कारुणिक आणि शुद्ध करणाऱ्या कथा सोबतच तीक्ष्ण बुद्धिमत्ता निर्माण करणारी कथा वाचायची असेल , जर देशाच्या प्राचीन आर्थिक ,धार्मिक, राजकीय आणि सामाजिक स्थितीचा परिचय करून घ्यावयाचा असेल तर आपणास जातक कथा ऐवजी दुसऱ्या कोणत्याच साहित्याची शिफारस करता येत नाही."[5]

आधुनिक रूपांतरण

जगातील सर्वात प्राचीन असलेल्या या कथांचे जगातील सर्व भाषेत भाषांतर झालेले आहे. भाषांतराचा विचार करताना व्ही. फाॅसबाॅल यांच्या कार्याचा आणि त्यामागील कष्टाचा , त्यागाचा गौरव आपल्याला करावाच लागेल.

व्ही.फाॅसबाॅल यांचे कार्य

मूळ पाली जातक कथांचे रोमन लिपीत रूपांतरण व्ही.फाॅसबाॅल यांनी केले. सहा खंडासह सातवी अनुक्रमणिका असलेले हे प्रचंड असे लेखन आहे. यासाठी त्यांनी 1877 ते 1899 अशी 21 वर्षे सतत मनन, चिंतन व अभ्यास केला. हे काम करताना त्यांना कितीतरी संकट आली.परंतु बोधिसत्वाच्या निग्रह वृत्तीने हे काम त्यांनी पूर्ण केले व जागतिक स्तरावर युरोपात जातककथा पोहोचवल्या.

यानंतर थायलंडच्या राणीने 1925 मध्ये जातकाचे दहा खंड थाई म्हणजेच सयामी लिपीत प्रकाशित केले. श्रीलंकेत सायमन हेवावीतरणे ब्रिक्वेस्ट सिरीज मध्ये सन १९५४ साली सिंहली भाषेत मूळ गाथा ,तर पुढे संपूर्ण जातक कथा प्रकाशित केल्या. इंग्रजी आणि इतरही युरोपीय भाषेत जातक कथांवर पुष्कळ ग्रंथ झाले आहेत. केंब्रीज विद्यापीठात 1895 ते 1913 पर्यंत सहा खंड प्रकाशित झाले. डॉ .भदन्त आनंद कौसल्यायन यांनी सहा खंडात हिंदी भाषेत अनुवाद केला आहे. बंगालीमध्ये ईशानचंद्र घोष यांनी प्रकाशित केले. देवनागरी लिपीत भिक्खू जगदीश काश्यप यांच्या संपादनाखाली नवनालंदा महाविहार येथून प्रकाशन झाले आहे. आचार्य धर्मानंद कोसंबी यांनी 1924 साली मराठी मध्ये अनुवाद केला. पुढे दुर्गा भागवत यांनी "सिद्धार्थ जातक "या नावाने सहा खंड मराठीत प्रकाशित केले अशा प्रकारे जगातील बहुतेक भाषेत व देशात या कथा पोहोचल्या आहेत आणि त्यांनी आपले समाज प्रबोधनाचे कार्य केले आहे." बौद्ध संस्कृती"" या ग्रंथात भदंत डॉ तिस्सवंस महास्थवीर यांनी तर म्हटले आहे की"" जागतिक लोककथांना बौद्ध संस्कृतीने सर्व प्रकारच्या कथा पूरविल्या[6]

जातक कालीन समाज जीवन

जातक कथांचा विचार करता समाजात क्षत्रिय वर्ग प्रमुख होता.

त्याचे समाजावर वर्चस्व होते. वर्णव्यवस्थेची उतरंड होती आणि त्याप्रमाणे व्यवसाय होते. समाजात क्षत्रिय, वैश्य ,ब्राह्मण याशिवाय शूद्र, चांडाळ आणि पुक्कसदेखील होते. परंतु ह्या निम्नवर्गीय लोकांचा जरी ते

गुणवान असले तरी त्यांच्या गुणाचा योग्य मोबदला मात्र त्यांना मिळत नसे.उदा." छवक जातक" यात चांडाळ बोधिसत्व ब्राह्मण गुरु व त्याच्याकडून ज्ञान घेणारा राजारूपी विद्यार्थी हे कसे दुराचरण करत आहेत हे समजावून सांगितले. राजाला त्याची योग्यता , बुद्धी पाहून आनंद झाला परंतु राजा म्हणाला , "जर तू उच्च कुळातला असतास तर तुला आज मी मोठ्या पदवीस चढविले असते तथापि तुझी योग्यता मोठी असल्याकारणाने मी तुला नगर रक्षकाच्या पदावर नेमतो".[7]

ब्राह्मणांना आपल्या उच्च स्थानाचा गर्व होता. क्षत्रियांनाही जाती श्रेष्ठत्वाची जाणीव होती. वैश्य वर्ग शेती, गोपालन व व्यापार करत असे.विवाहाचे स्वयंवर, गांधर्व व असुर हे प्रकार प्रचलित होते. बहुपत्नीकत्व प्रचलित होते. दागिन्यांची स्त्रियांना हौस होती. कुंडल , कटिबंध, पैंजण यांचा उल्लेख विविध जातकात आपल्याला आढळतो. लोक व्यापार, शेती करत .व्यापारासाठी लांबवर जात. मनोरंजनाची भरपूर साधने होती. उदा. जादूचे खेळ, डोंबारी, कुस्त्यांच्या शर्यती, तिरंदाजी, रथाच्या शर्यती वगैरे साधने होते.उत्सवात मद्यपान व मांस सेवन प्रचलित होते.

## स्त्रियांची आदर्श रूपे

जातक कथात स्त्रियांचे आदर्श माता ,आदर्श पत्नी, निर्भीड युवती वगैरे आदर्श रुपे आढळून येतात. मुलांत ज्ञानलालसेची महत्त्वाकांक्षा निर्माण करणारी उदात्त विचारसरणीची आई सुद्धा आपणास "सुसीम" जातक कथेत दिसून येते.[8]

"चुल्लकालिक "कथेत आपणाला चार विदूषी तरुणी भेटतात. त्यांचे आई वडील दोघेही विद्वान असून आईकडून त्यांनी 500 वादांचा अभ्यास केला आणि शास्त्रार्थ करण्यासाठी त्या सर्वत्र फिरतात. एवढेच नाही तर सारीपुत्ता सारख्या विद्वान तत्त्वज्ञानी व्यक्तीलाही त्या आव्हान देतात. आजच्या काळात या मुली आदर्श घेण्यासारखे आहेत.

"मणीचोर" जातक कथेतील सुजाता नवऱ्यावरील चोरीचा खोटा आरोप खोडते.आपला नवरा चोर नाही असे धीटपणाने सांगून प्रसंगावधान राखणारी वधस्तंभाकडे जाणाऱ्या नवऱ्याला ती पत्नी जीवदान देते. आणि अन्यायाला वाचा फोडून न्याय मिळवते.[9]

स्त्रियांमध्ये आत्मसन्मानाची भावना प्रखर होती. उम्मदन्ती"या जातक कथेत राजाकडून वधू परीक्षेला आलेला वयस्कर ब्राह्मणाचा मुलीचे रूप पाहून संयम सुटतो. व घास तोंडाऐवजी खाली पडतो हे पाहून उम्मदन्ती सर्वसमोर अत्यंत धीटपणे म्हणते की "माझी परीक्षा घेण्यास हे ब्राह्मण योग्य नाहीत त्यांना इथून हाकलून दिले पाहिजे"[10] अशा प्रकारे आदर्श असणाऱ्या स्त्रिया जातक कथातून दिसून येतात.

## सारांश

वरील सर्व विवेचनावरून हे स्पष्ट होते की

१. जातक कथांची निर्मिती समाजाच्या कुशलकर्माची शिकवण देण्यासाठी झाली आहे.
२. दहा पारमिता पारंगतेसाठी जातक कथांची निर्मिती झाली आहे.
३. या कथा समाजात लोककथा म्हणून प्रचलित होत्या. आणि त्यानंतर लिपीबद्ध झाल्या.
४. या कथांनी जागतिक स्तरावर प्रबोधन कार्य केले आहे.
५. जातक कथातील स्त्रिया आजही प्रेरक ठरतात.

## तळटिपा:

१. आचार्य धर्मानंद कोसंबी. जातक कथासंग्रह. कौशल्य प्रकाशन. पृष्ठ क्रमांक 1
२. आचार्य धर्मानंद कोसंबी. जातक कथासंग्रह. कौशल्य प्रकाशन. पृष्ठ क्रमांक 10.
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर. बुद्ध आणि त्यांचा धम्म. संवाद प्रकाशन. पृष्ठ 33
४. आचार्य रतनलाल सोनग्रा मैत्रेय बुद्ध. प्रकाशन आर के सोनोग्रा प्रतिष्ठान. पृष्ठ क्रमांक 5
५. आचार्य धर्मानंद कोसंबी. जातक कथासंग्रह. कौशल्य प्रकाशन पृष्ठ क्रमांक 7
६. महापंडित राहुल सांकृत्यायन. बौद्ध संस्कृती. मराठी अनुवाद. आनंद प्रकाशन. पृष्ठ क्रमांक 8
७. आचार्य धर्मानंद कोसंबी. जातक कथासंग्रह .कौशल्य प्रकाशन. पृष्ठ क्रमांक 226.
८. प्रा. सुशीला मुलजाधव भगवान बुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री. कौशल्य प्रकाशन. पृष्ठ क्रमांक 44
९. प्रा.सुशीला मुलजाधव. भगवान बुद्ध डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री. कौशल्य प्रकाशन पृष्ठ क्रमांक 46.
१०. प्रा. सुशीला मूल जाधव भगवान बुद्ध डॉ .बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री कौशल्य प्रकाशन. पृष्ठ क्रमांक 46.